**<u>नि. दि. दावा क्र. 23/2018</u>**
**<u>CNR-MHYA11-000459-2018</u>**

## नि. क्र. 87 वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. 05 ने कैफीयत दाखल करण्याचे परवानगीसाठी दिलेला आहे.

2. प्रतिवादी क्र. 5 असे कथन आहे की, ते प्रकरणात दिनांक 20/12/2018 रोजी वकीला मार्फत हजर झाले होते. त्यांना दिनांक 27/03/2019 रोजी लेखी जबाब दाखल करयाचा होता परंतु ते कामानिमीत्य हैद्राबाद येथे होते. त्यांना ठेकेदाराने मजुरीचे पैस व सुटी न दिल्यामुळे न्यायालयात लेखी जबाब दाखल करु शकले नाही. त्यानंतर त्याची मुलगी ही दुर्धर आजाराने आजारी पडल्यामुळे तो न्यायालयात लेखी जबाब दाखल करु शकला नाही. त्यामुळे त्याने लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केलेली आहे.

3. वादी क्र. 14 ने अर्जास म्हणणे (निशाणी क्र. 91) देवुन विरोध केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. 5 दिनांक 20/12/2018 रोजी प्रकरणात हजर झाले. त्याने जबाब दाखल करण्यासाठी अनुक्रमे नि. क्र. 57, 62, 65 व 70 दिनांक 20/12/2018, 31/01/2019 व 18/02/2019 रोजी अर्ज दाखल करुन वेळ मागितला. परंतु वेळ मिळुनही त्याने जबाब दाखल करण्यास टाळाटाळ करुन जाणुनबुजुन जबाब दिला नाही. त्याचे विरुध्द दिनांक 27/03/2019 रोजी विना कैफीयत चा आदेश पारीत झाल्यानंतरही बिना कैफीयतचा आदेश रद्द करण्याचा अर्ज न देता टाळटाळ करुन प्रकरण लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने नि. क्र. 87 वर खोटे विधाने करुन अर्ज दिलेला आहे. अर्जात कोणतेही सबळ कारण दिलेले नाही. त्याचे मुलीचे आजाराबाबत कोणताही वैद्यकीय दाखला दिलेला नाही. म्हणुन प्रतिवादी क्र. 05 चा अर्ज नि. क्र. 87 खारीज करण्याची विनंती केली आहे. नि. क्र. 87 जर मंजुर केल्यास रुपये 5,000/– कॉस्ट लावण्याबाबत विनंती केली आहे.

4. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

5. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. 05 यांना समन्स लागु होवुन ते दिनांक 20/12/2018 रोजी वकीला मार्फत प्रकरणात हजर झाले आहे. त्यांनी जबाब दाखल करण्यास पुढील तारीख मिळण्यासाठी नि. क्र. 57, 62, 65 व 70 नुसार प्रकरणात अर्ज दाखल केले आहेत. परंतु त्यांनी 90 दिवसांच्या आत त्याने कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. अर्जात दिलेले कारण जरी खरे मानले तरी त्याबाबत कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा इतर पुरावा अभिलेखावर दिलेला नसल्याने, झालेल्या विलंबा बाबत ते समाधान कारक दिसुन येत नाही. परंतु असे असले तरी न्यायाचे दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होण्यासाठी त्याची कैफीयत अभिलेखावर घेणे उचित ठरते. झालेल्या विलंबाबत त्याच्या कॉस्टस् बसविणे उचित ठरते.

6. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्ज कॉस्ट्स वर मंजुर करण्यास पात्र आहे. म्हणुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

कॉस्ट रक्कम रूपये 300/- वादींना अदा करण्याचे अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

स्वा/-
(अविनाश म. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उमरखेड

दिनांक : 11/12/2019